वर्धापन दिन विशेषांक

# सेवक वार्ता

जानेवारी-२०२३

वर्ष -५, अंक-३

कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, भांबुर्डा वन विहार, गोखले नगर, पुणे - १६

सेवक संघाच्या २८व्या वर्धापन दिनाच्या सर्व सेवक सदस्य व वाचक यांना हार्दिक शुभेच्छा !

## सेवक संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा

दि. २८ जानेवारी रोजी धुळे येथे सेवक संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली आहे. सभेचा अजेंडा खालीलप्रममाणे आहे.

१) सभासद नोंदणी.

२) उपस्थितांचे स्वागत, सभा अध्यक्षांची निवड व पदस्थापना.

३) गत वर्षातील दिवंगत सदस्यांना श्रध्दांजली.

४) सेवक संघाचे अध्यक्ष यांचे स्वागतपर भाषण.

५) उपस्थितांचा परीचय.

६) पंचवीसाव्या वार्षिक सर्वसाधाराण सभेचे वृत्तांत वाचन व त्यास मंजुरी.

७) सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचा लेखा परीक्षण अहवालाचे वाचन व त्यास मंजुरी देणे.

८) गत अहवाल वर्षातील झालेल्या कामांचा आढावा आणि पुढील वर्षातील कामाचा मागोवा.

९) गत अहवाल वर्षात शाखानिहाय झालेल्या कामांचा आढावा आणि पुढील वर्षातील कामाचे नियोजन

१०) संघाचे सभासद मासीक वर्गणी रु २०० /- वरुन कमीतकमी ५००/- व अजिवन सभासद शुल्क रु २०००/- वरुन ३०००/- करणे बाबत.

११) ७५ वर्षे वरील सभासद यांना सभेसाठी किंवा संघाचे कार्यक्रमास निमंत्रित केल्यास सर्वसाधारण पुणे ५००/- प्रवास भत्ता देणे बाबत.

१२) माधव गोगटे स्मृतीदिन कार्यक्रमाचे निमंत्रीत व्यक्तीस मानधन ८०००/- करणे बाबत

१३) चंद्रपूर, औरंगाबाद, नाशिक शाखा सक्षम करण्यासाठी उपाययोजना.

१४)श्रीमती रशीला वाढेर, वनक्षेत्रपाल गुजरात यांचा वन्यप्राणी बचाव कार्याबद्दल सत्कार व त्यांचे मनोगत

१५)सभाध्यक्षांचे अनुमतीने आयत्या वेळेचे विषय.

१६) श्री. बाजीराव छल्लारे सदस्यांचे किर्तन.

दिजाने २८ .. रोजी धुळे येथे सेवक संघाची वार्षिक सर्व साधारण सभेसाठी येणा-या सदस्यांचे हार्दिक स्वागत

## *नवी आव्हाने*

### एफ डी सी एम साठी स्मरणिका प्रकाशन

सन २०२४ मध्ये फॉरेस्ट डेव्हलपमेंट कार्पोरेशन ऑफ महाराष्ट्र च्या स्थापनेस ५० वर्षे पूर्ण होत आहेत . सन २०२४ हे सुवर्ण महोत्सवी वर्ष असल्याने, त्या अनुषंगाने वन विकास महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी यांनी सुवर्ण महोत्सव निमित्त का प्रकाशन करण्याचे ठरविले असून ते काम सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ महाराष्ट्र यांना प्रदान करण्यात आले आहे. सदर स्मरणिकेमध्ये गत कार्यकाळात विविध कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आलेल्या महत्त्वपूर्ण घडामोडी, घेण्यात आलेले निर्णय, एफ डी सी एम च्या वाटचालीतील महत्त्वाचे टप्पे याबाबत असलेली वैयक्तिक माहिती सदर अंकामध्ये प्रकाशित करण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार स्मरणिकेसाठी लेख, अनुभव, कथन, त्या वेळची छायाचित्रे मागविण्यात आलेली आहेत. सदर स्मरणिका सुमारे १०० पानाची असेल व त्यात त्यात ८० टक्के पाने साधी असतील व ८० % पाने रंगीत असतील. स्मरणिकेच्या एकूण १००० प्रतींची छपाई करून पुरवठा करणे बाबत येणाऱ्या खर्चाची माहिती कळविणेबाबत महाव्यवस्थापक यांनी सेवक संघास पत्र दिले आहे. या कामी व्यवस्थापकीय महासंचालक मुख्यालय श्री संजीव गौड सेवक संघास पत्राद्वारे कळविले आहे. त्या दृष्टीने श्री विठ्ठल पत्की कामास सुरुवात केली आहे.

### अभ्यासक्रम सुधारीत करून वाचन साहित्य निर्माण करणेचे काम

महाराष्ट्रातील वन प्रशिक्षण संस्थांमधील वनरक्षक व वनपाल जुने अभ्यासक्रमातील १४ विषयांवरील शिक्षण साहित्य सुधारित करणे, अभ्यासक्रम मंजूरी नंतर, सुधारीत अभ्यासक्रम व वाचन साहित्य निर्मित्तीसाठी सहाय्य करणेकामी कार्यारंभ आदेश अपर प्रधान मुख्य वन संरक्षक, वन संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण,म.रा. तथा संचालक,

चंद्रपूर वन प्रशासन,विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी ,चंद्रपूर यांचेकडून ६ विषयांसाठी प्राप्त झालेत.

वानिकी विषयांचे नवनिर्मित वाचन साहित्याचा पहिला मसुदा पाठवून, त्यांनी केलेल्या सूचनांचा विचार करुन अंतिम मसुदा त्यांना सादर करणे. समय समझोता अभिलेख (MoU) स्वाक्षांकीत केल्यापासून बारा महिन्याचे आत सादर करणे प्रस्तावित आहे.

समय समझोता अभिलेख :- तांत्रिक प्रस्ताव व वित्तिय यांचे गुण एकत्रित करुन,जास्त गुण प्राप्त करणाऱ्या यंत्रणेस काम मिळावे.अशा यशस्वी यंत्रणेशी ग्राहक समय समझोता अभिलेख स्वाक्षांकीत करतील.

खालील सदस्यांना प्रशिक्षण साहित्य तयार करण्याचे काम देणेत आले आहे.

१.वन संवर्धन शास्त्र भाग- १ - श्री. एस.के.गवळी
२. गवताळ जमीन  व्यवस्थापन - श्री. सुभाष बडवे
३. वन संवर्धन शास्त्र भाग- २- श्री. सुभाष बडवे
४. वन संवर्धन शास्त्र भाग- ३- श्री. एस. के. गवळी
५. वन संरक्षण- श्री. जे. ए. पाटील
६. वन / वन्यजीव कायदे- श्री. एस. एम. जगताप
७. वन्यजीव व्यवस्थापन, वनपर्यटन- श्री. जी. एस. खांडेकर
८. मृद व जल संधारण - श्री.  प्रदिप कुलकर्णी
९. वन अभियांत्रिकी- श्री. प्रदिप कुलकर्णी
१०. वन सर्वेक्षण, GIS/GPS -श्री. एस. व्ही. कुंभकर्ण
११. वन मिती - श्री. एस.व्ही. कुंभकर्ण
१२. वन व्यवस्थापन वकार्य आयोजना - श्री. मदन कुलकर्णी
१३. वनोपयोगिता- श्री. आर. बी. गिरी
१४. व्यवस्थापकीय कौशल्य विकास- श्री. बी. व्ही. सेलुकर
१५- संयुक्त वन व्यवस्थापन -  श्री.  एस. बी. धर्माधिकारी
१६. कार्यालयीन कामकाज पध्दती / लेखा-  श्री. मदन कुलकर्णी
१७. जमीन  अभिलेख - व्ही. बी. सूर्यवंशी/ विकास  जगताप
१८. जैवविविधता व्यवस्थापन - श्री.डॉ.एस.एच.पाटील
१९. वन वनस्पतिशास्त्र - श्री.डॉ.एस.एच.पाटील
२०. मृदाशास्त्र - श्री. प्रदिप कुलकर्णी

वरील विषय वाटप केलेल्या सदस्यांनी कामास सुरुवात २९ तारखेला क्षेत्रिय कर्मचाऱ्यांच्या सुधारणा कामाबाबत झालेल्या प्रगती संदर्भात सादरीकरण व चर्चा आयोजित करण्यात आली असून विषय वाटप सदस्यांनी पॉवर पॉईट प्रेझेंटेशन तज्ञ समितीसमोर करावयाचे आहे.

## प्रासंगिक...

**श्रीमती रशिलाबेन वाढेर,** द लायन क्वीन्स ऑफ इंडिया



जानेवारी २०२४ च्या महिन्यात मी नुकताच गुजरात राज्यातील माझ्या सन १९७८-८० चंद्रपूर रेंजर्स कॉलेजच्या बॅचमेटसनी आयोजित केलेल्या स्नेह संमेलनास उपस्थित राहून सहभाग घेतला. त्याचे नियोजनकामी तेथील कार्यरत  वन अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळाले त्यात वेरावळ येते सामाजिक वनीकरण विभागात काम करणाऱ्या श्रीमती रशिलाबेन वाढेर या पदोन्नत वनक्षेत्रपाल यांची आमच्या बॅचमधील आमच्या बॅचमेटसनी ओळख करून दिली व त्यांचा सत्कारही केला. श्रीमती रशिलाबेन वाढेर यांनी आमच्या बॅचमधील श्री हरीशभाई शर्मा, सहायक वन संरक्षक यांचे सोबत म्हणून सासन गीर राष्ट्रीय उद्यान व अभयारण्यात रेस्कू फॉरेस्टर म्हणून अनेक वर्ष काम केले होते. त्या गुजरात राज्यातील पहिल्या महिला वनरक्षक होत्या ज्यांनी वन्यजीव विभागात वन्यप्राणी बचाव वनपाल (Wildlife Rescue Forester) म्हणून काम केल्याने संपूर्ण भारतच नव्हे तर, परदेशातही प्रख्यात पावल्या. इथे श्रीमती रशिलाबेन वाढेर यांच्या तोंडून त्यांनी केलेल्या कामाची माहिती ऐकताना सर्वांना एक रोमांचक अनुभव आला व एक महिला वन कर्मचारी किती उत्कृष्टपणे काम करू शकते याची अद्‌भुत अनुभूती मिळाळी. वन्यप्राणी बचाव कामात त्यांनी दाखवलेली धाडसी वृत्ती , कर्तव्य परायणता, सेवाभाव,निष्ठा यामुळे वनपाल श्रीमती रशिलाबेन यांना अनेक बक्षिसे मिळाली आहेत, सत्कार झाले आहेत. तसेच सोशल मीडियावर, युट्युबवर त्यांच्या कामाची ठळकपणे नोंद घेऊन फार मोठ्या प्रमाणात प्रसिद्धीही मिळाली आहे. त्यांचे सर्व कार्य योगदान राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय वृत्तवाहिन्यांनी प्रसारीत केले आहे आणि डिस्कव्हरी चॅनेलवरील 30 मिनिटांच्या माहितीपट देखील आहे. त्यांनी केलेल्या कामाची थोडक्यात माहिती महाराष्ट्रातील वनकर्मचा-यांना व विशेष करून महिलांना व्हावी या दृष्टीकोनातून मी त्यांच्याशी तेथे भेट घेऊन चर्चा केली व माहिती घेतली . त्या अनुषंगाने त्यांच्या कामाची थोडक्यात ओळख करून देण्याचा हा प्रयत्न आहे.

श्रीमती रसिला पी. वाढेर या गुजरात राज्याच्या वनविभागातील सासन गिर राष्ट्रीय उद्यानात २००८ पासून रेस्क्यू फॉरेस्टर म्हणून कार्यरत होत्या. सध्या त्यांना वेरावळ, गिर सोमनाथ जिल्ह्यातील रेंज फॉरेस्ट ऑफिसर म्हणून बढती मिळाली आहे. तिने आपल्या सेवेदरम्यान ११०० हून अधिक वन्यजीव बचाव कार्य यशस्वीपणे केले आहेत. त्यामध्ये २५० हून अधिक सिंह, ५५० बिबट्या आणि मगर, अजगर, साप यांसारखे इतर वन्यप्राणी, जे चुकून शहराच्या परिसरात/गावात/शेतीच्या विहिरीत घुसले किंवा अडकले होते, अशा प्राण्यांची सुटका तिने करून त्यांना जंगलात सोडले. तसेच, गिर राष्ट्रीय उद्यान आणि अभयारण्याच्या किनारी असलेल्या परिसरात, व विशेषत: गावांमध्ये मानव-वन्यजीव संघर्षाच्या अनेक घटना तिने आश्चर्यकारकपणे आणि धैर्याने सोडवल्या आहेत. तिने रात्रीची गस्त, वन्यजीव बचाव केंद्राचे व्यवस्थापन, निसर्ग शिक्षण शिबिरात प्रशिक्षक म्हणून काम केले आणि वन्यजीव बचाव कार्यासाठी नवीन वन अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले. तिच्या सेवेत सिंह, बिबट्या, मगरी आणि साप हाताळताना जीवाला धोका यांसारख्या अनेक गुंतागुंतीच्या बाबींचा समावेश होता. वन्य प्राण्यांपासून मानवापर्यंत पसरणाऱ्या झुनोटिक रोगाने प्रभावित होण्याची शक्यता व असाद्य व दुर्धर आजाराने ग्रस्त होण्याची ती, वनक्षेत्रात कठीण ऋतूंमध्ये नियमितपणे कामाची व्याप्ती, विवाहित महिला म्हणून आव्हानात्मक नोकरीची कर्तव्ये उत्तम प्रकारे पार पाडणे कठीण काम या व अशा अनेक बाबींचा अतुलनीय समनवय साधत वन सेवा करत आहेत. त्या यासाठीही भाग्यवान आहेत की, त्यांचे कुटुंबीय तिला कोणत्याही प्रकारे लागणारी साथ देत आहेत.

वन्यजीव बचाव पथकातील प्रथम महिला अधिकारी म्हणून, तिच्या कार्याची गुजरात आणि भारतातील लोक प्रशंसा करतात. तिच्या कार्याची नोंद आंतरराष्ट्रीय बातम्या "द टाइम्स" आणि इतरांनी घेतली आहे. 'द लायन क्वीन्स ऑफ इंडिया' हा प्रसिद्ध माहितीपटही नियमितपणे दाखवला जातो. श्री नरेंद्रभाई मोदी आणि आनंदीबेन पटेल यांच्या हस्ते सन्मानित करण्याबरोबरच त्यांना अनेक राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कारही मिळाले आहेत.अशा प्रामाणिक कार्याचा विचार करून त्यांना पद्मश्री पुरस्कार देण्यासाठी शिफारस करण्यात आली असून त्यात नमूद केले आहे की, त्या पुरस्काराचा परिणाम देशातील धाडसी मुलींवर आणि महिलांवर अपरिहार्यपणे प्रभावी होईल. देश आणि देशातील महिलाशक्तीचा आदर केला जाईल.

सेवक संघातर्फे त्यांना धुळे येथे होणा-या सन २०२२-२३च्या सर्व साधारण सभेत श्री. विश्वास सावरकर, अध्यक्ष यांचे हस्ते सन्मानपत्र देऊन गौरवित करण्यात येत आहे.

२८व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने विशेष लेख....

# सेवकचा जन्म सोहळा

**- वसंत जोशी**

कोणत्याही पित्याला त्याच्या अपत्याच्या जन्माची आठवण ही अगदी मनमोहीत करून टाकते यात जराही शंका नाही. मग एखाद्या संस्थेच्या जन्माची आठवण ती संस्था जवळ जवळ २७ वर्षांनंतर, प्रतिदिनी वृद्धिंगत होत जाणा-या चंद्रकलेप्रमाणे, आपल्या कर्तृत्वाच्या बळावर विविध शाखांनी समृद्ध बनून व आपल्या सभासदांच्या अथक परिश्रमातून विविध प्रकारच्या कामगिरी अत्यंत कौशल्याने पार पाडून जनमानसात लोकप्रिय झालेली पाहण्यात तिच्या संस्थापकाला काय अवणर्नीय आनंद होत असेल, हे शब्दात व्यक्त करणे जरा कठीण ठरणारे होणार आहे. तरी मी सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ ह्या संस्थेच्या मुळ सात संस्थापकापैकी आजमितीस ह्यात असलेला एक संस्थापक या नात्याने ही संस्था कशी अस्तित्वात आली याचा थोडा मागोवा घेण्याचा प्रयत्न करणार आहे.

मी, वसंत सीताराम जोशी ३१ ऑगस्ट १९९५ रोजी विभागीय वनाधिकारी, संशोधन, पुणे ह्या पदावरून, सर्वपरिचित व अत्यन्त कार्यक्षम म्हुणुन प्रसिद्ध असलेले वनाधिकारी श्री. मा. ग. गोगटे, यांच्या हाताखाली तयार होऊन, निवृत्त झाल्यांनतर कोणतेही काम न करता स्वस्थ बसणे हे माझ्या स्वभावात बसत नसल्याने व त्याकाळी महाराष्ट्रात सेवानिवृत्त वनकर्मचारी यांची कोणतीही संघटना अस्तित्वात नसल्याने, अशी संस्था आपण का स्थापन करू नये ह्या विचाराने प्रभावीत होऊन मी उत्साहाने कामास सुरवात केली.

सर्वप्रथम मी माझेहून तीन वर्षे ज्येष्ठ असलेले श्री गु. श, दळवी यांची भेट घेऊन त्यांना माझी कल्पना सांगितली. त्याना ती पटल्याने आम्ही दोघांनी श्री. गोगटे साहेब यांची भेट घेउन त्यांचा सल्ला घेतला. ते म्हणाले तुमची कल्पना उपयुक्त आहे. पण अशी संघटना यशस्वी होण्यासाठी तुमच्यापाशी काही गंगाजळी तयार असली पाहिजे व त्यासाठी तुंम्ही तुमच्या संघटनेमार्फत तुम्हास निधी उत्पन्न होईल अशी कमी पार पाडावी लागतील तरी तम्ही तशी तरतूद तुमच्या संघटनेच्या घटनेन करा तसेच सहकारी संस्थेच्या धर्तीवर तुमच्या संस्थेची घटना लवकर तयार करून ती धर्मदाय आयुक्त यांचेकडे मंजुरीसाठी सादर करा.

सदर सल्ल्यानुसार मी माझेहून चार वर्षे ज्येष्ठ असलेले श्री. व. का. चावरे यांची भेट घेऊन त्यांना आमच्या गटात सामील करून घेतले व त्यांच्याच सहकारी गृहरचना संस्थेच्या घटनेची प्रत मिळवून त्यानुसार आम्ही तीघात्री मिळून संस्थेची घटना तयार केली. आता संस्थेच्या कार्यकारी मंडलासाठी सात सभासदांची आवश्यकता असल्याने आम्ही खटपट करून माझेहून दोन वर्षे ज्येष्ठ असलेले श्री. द. ह. दातार यांची भेट घेऊन त्याना संस्थेचे अध्यक्ष म्हणून बनविण्याचे ठरविले. श्री दळवी यांनी कोषाध्यक्ष म्हणून काम करण्याची तयारी दर्शविली व मी स्वत: कार्यवाह काम करण्यास सहमती दिली. नंतर माझे समकालीन श्री. रा. वी. ब्रह्मे, एक वर्ष कनिष्ठ असलेले श्री जब्बार खान व सेवानिवृत्त जीप चालक श्री. न. र. सावंत या तिघांना संस्थेचे सभासद बनविले सुरवातीस संस्थेचे कार्यक्षेत्र पुणे जिल्हयापुरतेच मर्यादित ठेवण्याचे ठरवीले.

ह्या प्राथमिक तयारी नंतर आम्ही प्रथम सहकारी संस्था निबन्धक, पुणे यांचेकडे संस्थेच्या घटनेसह संस्थेच्या मान्यतेसाठी अर्ज दाखल केला. पण बरेच खेटे घातल्यानंतर त्यांचे कडून मान्यता मिळविण्यास १९९६ साल उजाडले. त्यानंतर खरी लढाई धर्मदाय आयुक्त यांची मान्यता मिळविण्याची असल्याने, आम्ही आमच्या कंबरा कसून तयार झालो. तेथे दोन चार खेटे घातल्यावर अस लक्षात आले की येथे प्रत्येक खेट्या नंतर काही तरी नवीनच तृटी काढून कालापव्यय केला जात आहे. तेंम्हा तेथेच उपलब्ध असलेल्या एका वकिलाने आम्हास सल्ला दिला की आमचे सहाय्य घ्याल तर मान्यता लवकर मिळणे शक्य होईल. त्यानुसार त्याच वकिलाची मदत घेऊन कामास सुरवात केली. व अखेर जानेवारी १९९७ च्या अखेरीस संस्थेस मान्यता प्राप्त झाली.

आता ह्या मान्यतेचा टीळा आमच्या कपाळी लागल्याने संस्थेसाठी माझे निवास स्थान हे संस्थेचे अधिकृत निवासस्थान श्री दळवी यांचे निवास स्थाना जवळच जनता सहकारी ब्यांकेची शाखा असल्याने तेथे संस्थेचे नावाने बचत खाते उघडण्यात आले. या आवश्यक बाबींची पूर्तता झाल्यावर संस्थेचा लोगो तयार करण्यासाठी मी वनखात्यातील निवृत्त कलाकार यांना भेटून त्यांना समर्पक लोगोचे डिझाईन तयार करण्याची विनंती केली. त्यानीही उत्साहाने एका वर्तुळात एक दुमडलेले पान दाखवून त्याच्या एका बाजूस हिवा व दुसग्रा बाजूस पोपटी रंग दिला व त्यातून असे दर्शविले की जरी सेवानिवृत्त वनकर्मचारी वृद्ध झाले तरी ते कोणत्याही कामास ते सदा तयारच असतात. ह्या चित्रास समर्पक घोषवाक्य म्हणून मी 'वर्धीष्णू वने युवा मने' असा मजकूर तयार केला व तो सर्वास मान्य झाला.

संस्थेचे अध्यक्ष म्हणून आता पर्यंत अनेक मान्यवर ज्येष्ठ वनाधिकारी लाभले ते ह्याप्रमाणे होते. सर्वश्री य. ग. जाधव, डॉ. अ. रा. मसलेकर, डॉ. अ. ग. रड्डी, रा. ल. चौधरी, मो. ह. खेडकर, अ. ना. बल्लाळ, मा. स. पारसनीस, मा, ग. गोगटे, वि. त्रयं. पत्की. रा. मो. आरगे (सेवानिवृत्त वनपाल), वी. कु. मोहन, शिरीष अस्थाना, वि. ब. सावरकर (विद्यमान). सन २००४ पासून संस्थेस वन विकास यंत्रणा अंतर्गत रोपवनाचे मुल्यांकन अशासारखी निधी मिळवून देणारी कामे मिळण्यास सर्वात झाली व त्यानंतर संस्थेने आजतागा मागे वळून पाहिलेच नाही इतकी विविध कामे संस्थेस मिळत आहेत. तसेच संस्थेच्या आजीव स्भासदामध्येही लक्षणीय वाढ होत आहे. सन २००४ पासून सन २००८ पर्यंत संस्थेने 'निसर्गवाणी' हे त्रैमासिक चालविले होते त्याचे मुख्य संपादक श्री गोगटे साहेब होते व कार्यकारी संपादक मी होतो. कालांतराने संस्थेसाठी संकेतस्थळही मी श्री पत्की यांच्या मार्गदर्शनाखाली बनवून दिले व आता त्याने चांगले बाळसे धरले आहे, सन २०२१ पर्यंत मी संस्थेचे रोखालेखे अद्यावत ठेवण्याचे काम सांभाळत होतो पण आता प्रकृती अस्वास्थ्यामुळे मला ही कामे जमत नसल्याने मी त्या जबाबदारीतून आता मुक्त झालो आहे.

आता संस्थेच्या मुळ कार्यकारीणीपैकी श्री दातार व मी स्वत: हे दोघेच ह्यात आहोत. संस्थेची प्रगती अशीच वायुवेगाने हो राहो अशी शुभकामना मी परमेश्वरापाशी व्यक्त करत आहे. आजवर मला सेवक सभासदांकडून लाभलेल्या सहकार्याबद्दल मी सर्वांचा मन:पूर्वक आभारी आहे. धन्यवाद !

## *नवी आव्हाने*

### अभ्यासक्रम सुधारीत करून वाचन साहित्य निर्माण करणे हे काम

अप्रमुवसं, संशिप्र म.रा. तथ संचालक, चंद्रमा, चंद्रपूर यानी महाराष्ट्रातील वन प्रशिक्षण संस्थांमधील वनरक्षक व वनपाल जुने अभ्यासक्रमातील १४ विषयांवरील शिक्षण साहित्य सुधारित करणे व अद्यावत (सद्यस्थिती नुसार) असणे आवश्यक आहे असे सेवक संघास कळवून याकरिता स्वारस्य अभिरूची बाबत विचारणा केली आहे. त्याचे स्वागत करून विषय वार तज्ञ व्यक्तींचे चमू तयार करणे व इतर अनुषंगिक बाबीवर जसे कार्य कालावधी, शुल्क आणि प्रक्रीया चर्चा ५ सप्टें.च्या केंद्रीय कार्यकारिणीच्या मासिक सभेत झाली **वन रक्षकांचे २४ आठवड्याचे प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र राज्यातील वन**

**विभागास, अभ्यासक्रम मंजूरी नंतर, सुधारीत वाचन साहित्य निर्मित्तीसाठी सहाय्य करणेकामी स्वारस्य इरादा प्रस्ताव (Expression of Interest) अपर प्रधान मुख्य वन संरक्षक, वन संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण,म.रा. तथा संचालक, यांना जेणे करून वाहन व्यवस्था करणे सुकर होईल.**


**सेवक संघाच्या धुळे येथे आयोजित वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने धुळयाच्या इतिहासासंबंधी लेख.....**


## आमचे धुळे शहर


प्राचीन ग्रंथांमध्ये धुव्याचा उल्लेख धुलिकापट्टनम असा आहे. धनगर गवळी समाजाच्या धूळोबा ह्या श्रद्धा स्थान वरुण धुळे नाव पडले असावे. तर पेशव्यांनि त्यांच्या एका ताळेबंदांत धुळे म्हणजेच महमदपुर असे म्हटले आहे पूर्वी धुव्याचे 3 भाग होते. देवपुर, जुनेधुळे, मोगलाई. लुटालूट दुष्काळ लढाई ह्या मुळे धुळे त्रासले होते.
१८०४ ला सरदार विंचुरकर यानी बाळाजी बळवंत ह्या सरदारस धुळे चा कारभार दिला. १८१८ ला इंग्रजांनी मराठ्यांना हरवून धुळे ताब्यात घेतले. कॅप्टन ब्रिग्ज़ हां धुळे मध्ये आला. त्याने दंडकग्राम पद्धत वापरून धुळेची नगर रचना करवून घेतली. कौटिल्याने नगररचनेच्या ८ मुख्य आणि ८ उप पद्धति संगीतल्या आहेत. काटकोनात एकमेकांना छेद देणारे समान उभे आणि आडवे मुख्य रस्ते आणि तेव्हढेच उपरस्ते हे ह्या नगर रचनेचे वैशिष्ट्य. धुळे ची तुलना नगर रचनेच्या बाबतीत जयपुर शी केली जाते.
-धुळे शहराची आखीव-रेखीव आखणी ही १८१८ मध्ये कॅप्टन ब्रिग्ज यांनी केली आहे. १८१८ मध्ये ब्रिटीशांनी मराठ्यांवर पूर्ण विजय संपादन केल्यानंतर कॅप्टन ब्रिग्ज यांची खान्देशाचे अंमलदार म्हणून नियुक्ती केली होती. त्यावेळी ब्रिटीशांची लष्करी वसाहत मालेगावला होती. कॅप्टन ब्रिग्जला उत्तरेहून विंध्य, सातपुडा, नर्मदा, तापी ओलांडल्यावर आणि पश्चिमेस सुरत व पूर्वेस धरणगावला असणाऱ्या इंग्रजी व्यापार वखारींच्या दृष्टीनातून धुळे हे ठिकाण मध्यवर्ती वाटले. लष्करीदृष्ट्या धुळे या खेड्याचे कॅप्टन ब्रिग्जला अधिक महत्व वाटले होते. त्यावेळी धुळे (जुने धुळे) हे अवघ्या दीडशे घर-झोपड्यांचे लहानसे खेडे होते. धुव्यासोबतच नदीच्या पलिकडे देवपूर व पश्चिमेस मोगलाई अशी दोन गावठाणे होती. कॅप्टन ब्रिग्जने संयुक्त खान्देशची राजधानी (धुळे-जळगाव-नंदुरबार-बागलाण एवढा खान्देश- यात बऱ्हाणपूरपर्यंत खान्देश मानला जात असे) म्हणूनच धुळे वसवायचे ठरविले.लष्करी छावणीचीही आखणी केली. त्यामुळेच जुने कलेक्टर ऑफिसपासून थेट मोगलाई-कुमारनगर व इकडे धुळे कोर्टापर्यंतच्या भुभागाची अत्यंत जुनी कागदपत्रे पाहिली तर त्यावर 'छावणी' असाच उल्लेख सापडतो. धुळे न्यायालयाची आज जी इमारत आहे ती ब्रिटीशांनी मुळात लष्करी सिव्हिल हॉस्पिटल म्हणून बांधली होती. याशिवाय टेक्निकल स्कूल, दगडी शाळा कारागृह अशा किती तरी मोठमोठ्या, देखण्या इमारती ब्रिटीशांनी बांधल्या आहेत. ब्रिटीश अंमलदार कॅप्टन ब्रिग्ज याने धुव्यास लष्करी छावणीचे रूप देण्यासाठी कामास सुरूवात केली, तेव्हा त्यांने सर्वात पहिली इमारत धुव्यात आज नव्या कलेक्टर ऑफिसमोर जी दस्त नोंदणीची रजिस्टारची कौलारू इमारत आहे, ती बांधली होती. तेथे स्वतःचे प्रथम ऑफिस थाटले होते. त्यानेच आजची अवाढव्य जमिनीवर असलेली जिल्हाधिकारी निवासस्थानाची-बंगल्याची इमारत बांधली होती. जिल्हाधिकारी यांचा बंगला इतक्या मोठ्या भुभागावर असणारे मोजक्या शहरापैकी धुळे एक आहे. ब्रिग्जच्याच काळातील जिल्हा पोलिस अधीक्षक, सिव्हिल सर्जन व अन्य बड्या अधिकाऱ्यांच्या बंगल्यांच्या भव्य, ऐसपैस वास्तू, भरपूर मोकव्या जागेत ब्रिटीश काळातच बांधण्यात आल्या आहेत.बहुतेक लोक समजतात तश्यातल्या माननीय भारतरत्न कै. सर विश्वेश्वरय्यांच्या काळातल्या या इमारती नाहीत. कॅप्टन ब्रिग्जने दीडशे घरांचे धुळे छावणीत रूपांतरीत करण्याचा निर्णय घेतला तेव्हा, धुळे या खेड्याचा कारभार लळींग या सजातून चालत होता. धुव्यापेक्षा लळींग आणि सोनगीर हे मोठे होते. धुळे, देवपूर, मोगलाईच्या लोकांना जवळची मोठी बाजारपेठ सोनगीर होती. कॅप्टन ब्रिग्जने आताच्या धुळे शहरातील नगरपट्टी ते मनोहर थिएटर या भागात नागरी वस्ती वसावयाचे ठरविले. त्यासाठी बांबू व दोरी लावून जुना आग्रारोडला समांतर दोन्ही बाजूस सरळ रेषेत उभ्या- आडव्या गल्ल्यांची आखणी केली. त्याच आजच्या गर्ल्ली नं. एक, दोन, चार, सात आणि या गल्ल्यांना आडव्या छेदून जाणाऱ्या गल्ल्यांमुळे निर्माण झालेले चौक, त्यांना आपण खुंट असे म्हणतो. या ठिकाणी नागरिकांनी, व्यापाऱ्यांनी, बारा बलुतेदारांनी येवून रहावे म्हणून कॅप्टन ब्रिग्ज यांनी बऱ्हाणपूरपासून सुरतपर्यंत विविध मोठ्या गावातील लोकांना व्यावसायिकांना विविध सवलती देवू केल्या, बाहेरून आणून या लोकांना धुव्यात वसविले. असे म्हणतात की उभ्या आडव्या सरळ रेषेत असणाऱ्या गल्ल्यां-रस्त्यांमुळे धुळे शहर हे चंदिगड पाठोपाठचे रेखीव शहर आहे. हे नियोजन कॅप्टन ब्रिग्ज यांचे आहे. ब्रिग्ज यांनी छावणी म्हणून नियोजन करून आखीव-रेखीव धुळे शहर तर वसविले; परंतू नंतर ब्रिटीशांचा देशावर सर्वत्र अंमल झाल्याने धुळे येथे लष्करी छावणी करण्याचा त्यांचा उद्देश बारगळला, निर्णय रद्द झाला. मात्र त्या निमित्ताने आखीव रेखीव व विस्तृत, मोठ्या मोकव्या जागांवरील सरकारी इमारतींच्या अशा धुळे शहराची मुहूर्तमेढ रोवली गेली होती, ती कायम राहिली. मग प्रश्न निर्माण होतो हा, की सर विश्वेश्वरय्या यांचा धुव्याशी संबंध काय? भारतरत्न सर विश्वेश्वरय्या यांनी धुळे शहराची पिण्याच्या पाण्याची योजना तयार केली आहे. एक युनिट विजेचा खर्च न करता केवळ गुरूत्वाकर्षणाने डेडरगाव तलावाचे पाणी धुळे शहरात मालेगाव रोडवरील दगडी टाकीपर्यंत आणण्याची एकमेव अशी सायफन व ग्रॅरूत्वाकर्षण आधरीत पाणी पुरवठा योजना त्यांनी बनविली आहे. ही आगळी-वेगळी अशी योजना बनविण्याचे श्रेय सर विश्वेश्वरय्या यांचे आहे. सर विश्वेश्वरय्या ऑक्टोबर १८८५ मध्ये धुव्यास आले होते. त्यांचे धुव्यात १६ महिने वास्तव्य होते. त्यावेळी त्यांचे पद होते सहाय्यक अभियंता वर्ग एक. त्यावेळी कार्यकारी अभियंत्यांचाही काही काळ कार्यभार त्यांच्याकडे होता.

त्यांनी साक्री तालुक्यात दातर्तीला पांझरा नदीच्या खालून ३०० फूट लांबीचा सायफन पद्धतीचा कालवा १३० वर्षापूर्वी बांधला आहे. तो आजही कार्यरत आहे. संपूर्ण जगात अभ्यास होणारी व नावाजलेली पांझरेवरची फड सिंचन पद्धत ही डॉ. सर विश्वेश्वरय्या यांचीच देणगी. यात लाभक्षेत्रातील सर्व शेतकऱ्यांना समान पाणी मिळण्याची अत्यंत व्यवहार्य पद्धत त्यांनी त्याकाळी आखून दिली होती. हीच पद्धत त्यांची पुण्यास नियुक्ती झाल्यावर तेथे त्यांनी सुरू केली होती. नंतर म्हैसूर संस्थानचे दिवाण, तेथे प्रचंड मोठ्या धरणाची निर्मिती, पं. नेहरूंच्या आग्रहास्तव ९० व्या वर्षी गंगेवरचा पूल बांधण्याची कामगीरी, ५० वर्षानंतरचा हिंदुस्थान व अनेक पुस्तके त्यांनी लिहिली. धुळ्यात निवृत्त अभियंता हिरालालजी ओसवाल व सहकाऱ्यांनी त्यांचे स्मृती निमित्त धुळ्यात जुन्या सिव्हील समोर बांधकाम खात्याच्या आवारात एक चांगले संग्रहालय निर्माण केले आहे. निश्चितच सर विश्वेश्वरय्या यांचे धुळ्यासाठी योगदान मोठे आहे. परंतू ते धुळ्यात येण्या अगोदर जुने धुळेसह ग.नं. १ ते ७ व नगरपट्टी ते आताचे मनोहर थिएटर एवढ्या भागात नागरी वसाहत आणि शासकीय मोठमोठ्या इमारतीचे धुळे शहर नावारूपास आलेले होते. त्यावेळी धुळ्याची लोकसंख्याच ५०-६० हजार इतकी झालेली होती. धुळ्याच्या इतिहासाचा विपर्यास होवू नये, असेच कुणीही सुज्ञ धुळेकर मानेल. कै. सरविश्वेश्वरय्या यांच्या कामगिरीस सलाम. पण मुळ धुळे शहराची आखीव स्थापना १८१८ मध्ये आलेल्या कॅप्टन ब्रिग्ज यांनी केली आहे. त्यांनी धुळ्यात बनविलेली पहिली इमारत रजिस्ट्रार ऑफिसला आता काही वर्षापूर्वी आग लागली होती. तेव्हा तेथे देखील या स्थापनेच्या कोरीव मजकूराची शिला सापडली होती.

------------------------------------------------------------









## सायलेंट व्हेली राष्ट्रीय उद्यान

मनोहर अे. सैंदाणे
सेनि वि.व.अ. दक्षता पुणे४११०५७

केरळ बाबत अस म्हटल्या जाते की, केरळ म्हणजी देवाचे रहायचे घर आहे.याचा अनुभव मला साक्षात अनुभवायला मिळाला. निसर्गरम्य समुद्री किनारा लाभलैला असताना एकाहून एक सुरेख वनस्थळे अनैकविध वन्यजीवांचे आश्रयस्थान असणारा हा प्रदेश आहे. हया राज्यात उंच, रम्य, थंड हवेची हील स्टेशन असून त्यात विवीध प्रकारचे वन्य प्राणी, वनस्पती, वन्य पक्ष्याचा अधिवास आहे. जैविक विवीधता असलेले आाणि खूप कमी लोकांच्या बघण्यात आलैलै एक वन स्थळ म्हणजि सायलेंट व्हली राष्ट्रीय उद्यान. कैरळातील पलक्कड जिल्हयामध्ये असून मन्नारकड पासून ४३ कि.मी. अंतरावर आहै.कोअर झोन एकूण ८९.५२ चौ.कि मी. क्षेत्र व सभोवताली १४८ चौ.की.मी.ज्यात बफर झोन लाभलैल्या

समृध्द प्रदेशामध्ये अतीशय वैविध्यपूर्ण समृध्द वन्यजीव पहाणेस मिळतात. कुंती केरळातील अतीशय आवडती नदी आहे. याच नदीच्या काठावर हे राष्ट्रीय उद्यान वसलेले आहे. कुंती नदी समुद्र सपाटीपासुन २००० ' उंची वर उगम पावते आणि भारतपुजा या नदीस येउन मिळते. नदीच्या प्रवासात अनेक सुरेख वळणे घेत तिथल्या निसर्गरम्य संपन्नतेचे जीवन फुलवत असते. हया राष्ट्रीय उद्यानास भेट देणे ही निसर्ग प्रेंमीना एक पर्वणीच आहे. हया भागात अतिशय दुर्मीळ व नष्ट होण्याच्या मार्गावर असलेले प्राणी,पक्षी, असून अरुंद पानांचे वनस्पतीनी नटलेला परिसर आहे. सदर जंगलाचा समृध्द भाग हे शोला जंगल सुद्धा म्हणुन संबोधतात आणि चांगले जैव विविधतेचे उदाहरण आहे. या भागात कधीच या पुर्वी जंगलावर मानवी आतिकमण झालेले नाही. हे क्षेत्र भारताचे पच्चिम घाट पर्वत रांगातील दक्षिण सदाहारित ओलसर वनात मोडते. वन प्रेमीना येथे भेट देणे, एक अपूर्व संधी आहे. या भागात नष्ट होत असलेल्या बरेच प्राणी,पक्षी व वनस्पतीच्या प्रजातीचे मुळस्थान आहे .या भागात नवीन संशोधित प्रजातीची नोंद हया क्षेत्रात केली आहे.

आढळणारे वनस्पती - येथ १००० पेक्षा जास्त प्रजातीची सपुष्प वनस्पती , १०८ प्रकारचे आर्कीड, फर्न वनस्पतींचे १०० प्रकार आणि ५०० हुन आधिक अलगीचे प्रकार, २०० प्रजातीची लीव्हर वर्ट व ७५ प्रजातीची लायकेन,२०० प्रजातीची अलगी व इतर प्रकार, या ठिकाणी पहायला मिळतात. क्युलेनिया एक्झारिलाटा या मोठया आणि उंच प्रजातीच्या वृक्षांच्या फुलोरा मूळे 'लायन टेल्ड मकाक' या माकडाचे अस्तित्व या वनामुळे टिकून आहे .

आढळणारे पक्षी - एकूण १३८ प्रकारचे विविध वन्य पक्षांच्या प्रजाती आहेत. यामध्ये आंतर राष्ट्रीय यादितील १६ प्रकारचे प्रजाती, दुर्मीळ नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. त्यात निलगिरी वुड पीजन, मलबार पेराकिट, व्हाइट बेलीड ट्री पाय, ग्रे हेडेड बुलबुल,बाड टेल्ड ग्रास बर्ड ,रुफोज बाबलर,वायनाड लाफिंग थ्रश, निलगिरी फलाय केचर, निलगिरी ब्ल्यु राबिन. क्रिमझन बेक्कड सनबड निलगिरी पीपीट इ. तसेच दुर्मीळ प्रकारचे पक्षी जसे ग्रेट इंडीयन हार्नबील,सिलोन फ्रागमाउथ लाग्न लेग्गड् बझारड् आढळतात. या भागातील सर्वे केल्यावरुन १० दुर्मीळ प्रजाती दुर्मीळ व नष्ट होण्याचया मार्गावर असलेले वन्य पक्षी, रेड विंगड कक्कु , मलबार पाईड हार्न –बील पेल हेरिअर,ब्लक व ओरेंज फलाय केचर प्रजाती सह "आंतर राष्ट्रीय निसर्गसंवर्धन संघ "आय.यु.सी.एन.च्या लाल यादीत समाविष्ट केल्या आहेत. सस्तन प्राणी - या प्राण्यांच्या वैवध्यामध्ये कमीतकमी ३४ प्रजाती आहेत. वाघ, बिवट, लिओपार्ड कअट, रानकुत्री, हत्ती, गौर,स्लोथ बीअर, सांबर, भेडकी,ढोल, इंडियन पंन्गोलीन, वाइल्ड पारकुपाइन, , स्पाटेड डीअर, इ. महत्त्वाचे म्हणजे निलगीरी थार, वास्तवाला आहेत. माकडा मध्ये लायन टेल्ड मकाक ज्यामुळे सायलेंट व्हली ओळखली जाते. वरील दोनही प्रजाती नष्ट होण्याचे मार्गावर आहेत. तसेच दुर्मिळ व नष्ट होण्याचे मार्गावर निलगिरी लंगूर , मलबार जाइन्ट खार , पेशवाज वटवाघूळ इ. आढळतात. किटक व ईतर जीव. अनेक १२८ प्रकारचे फुलपांखरे येथे बागडतांना दिसतात. ७३० प्रकारचे किटक,३३ प्रकारचे नाकतोडे व इतर ५०० प्रकारचे जळू व गांडुळ, सापांमध्ये २५ जाती, नदी मध्ये मासोळयांच्या १२ तर उभयचरांचे १९ जाती या ठिकाणी वास्तव्याला आहेत. या परिसरात नाविन्यपूर्ण बुश बेडुक पाहाण्यासारखा आहे. १९८४ साली राष्ट्रीय उद्यानाचा दर्जा मिळाला. अनेक निसर्गप्रेमींनी या ठिकाणी १९८४ साली लोकांनी जन आंदोलन उभारुन या ठिकाणाच्या हायड्रो ईलेक्ट्रीकच्या प्रोजेक्टच्या उभारणीसाठी विरोध केला. ज्यात स्व. इंदिरागांधीनी धरण उभारणीच्या आदेशावर बंदी आणून काम थांबविले. या चळवळी मेळे, ही निसर्ग दत्त देणगी नामशेष होण्यापासून वाचली आहे. , सृष्टी संवर्धनामध्ये सर्वसामान्यांचा सहभाग किती महत्त्वाचा व मोठा आहे हे मी अनुभवले. सन २००७ मध्ये युनोस्कोने जागतिक वारसा क्षेत्र म्हणून घोषित केले आहे. एखादया तीर्थस्थळी गेल्यावर सर्वात मोठया देवाचे दर्शन घेतल्या सारखे मला लाभले. हा निसर्गदत्त अमल्यू ठेवा जतन करण्याचे मोठे आव्हान आहे. आग, अवैध चराई, अवैध वृक्ष कटाई अवैध शिकार, अवैध गैर टींबर उत्पादने गोळा करणे इ. यावर,आवर ठेवणे अगत्याचे आहे. टूरीष्टच्या चूकांमुळे मोठया आगी लागु शकतात. अवैध अतिक्रमणाने लागवड करणे हा सुध्दा एक प्रश्न आहे.

## आजीवन सदस्य

**श्री. अशोक श्रीराम खुणे, निवृत्त स. व. स. नागपूर वनवृत्त यांनी आजीवन सेवक सभासद शुल्क अमरावती सेवक शाखेत जमा करून आजीवन सदस्यत्व स्विकारले आहे. त्यांचे सेवक संघ परिवारात स्वागत.**

## निधन वार्ता

**ज्येष्ठ सदस्य श्री आर. डी. सालेहित्तल यांचे दि. ९-१-२४ रोजी दुपारी १२.०५ वाजता पुणे येथे वृध्दापकाळाने निधन झाले. ते एक प्रामाणिक, कुशल विभागीय वन अधिकारी होते. अत्यंत साधे राहणीमान असलेले ते उत्तम खेळाडू होते. सेवक संघ सदस्यांतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली. ईश्वर त्यांचे आत्म्यास सदगती देवो, ही प्रार्थना**

## वेधक वृत्त

**संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतलेल्या व पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांचे हस्ते २२ जानेवारी २०२४ रोजी उदघाटन झालेल्या अयोध्या येथील भगवान श्री राम मंदिरासाठी चंद्रपूरच्या जंगलातील सागवान लाकूड वापरण्यात आले.**

केवळ खाजगी वितरणासाठी

**प्रकाशक - सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे**

**संपादन - एस. के. गवळी**